स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१

स्वररंग

विद्याविकास

फॅक्स क्रमांक २५६०११५४

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११००७

**रासेयो/२०२३–२४/२०८** **दि. १२/०७/२०२३**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : जी–२०, जनभागीदारी, पंचप्रण– युवा संवाद अभियानांतर्गत महाविद्यालय स्तरावर निबंध स्पर्धेच्या आयोजनाबाबत.**

महोदय/महोदया,

मा. पंतप्रधान यांच्या आवाहनानुसार संपूर्ण देशभर जी–२०, जनभागीदारी, पंचप्रण– युवा संवाद अभियान राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे.

सदर उपक्रमांतर्गत आपल्या महविद्यालयात पुढील नमुद केलेल्या जिल्हानिहाय विषयावर किंवा पंचप्रण विषयावर निबंध लिहून यामधून (रासेयो २ व विविमं २ निबंध) असे एकूण ४ निबंध आपल्या महाविद्यालयातील संबधित कार्यक्रम अधिकारी/विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्यामार्फत सदर निबंध आपल्या विभाग समन्वयकांकडे दिनांक १५ जुलै, २०२३ पर्यंत हस्तलिखीत स्वरूपात जमा करावेत. त्यानंतर रासेयो/विविमं विभाग समन्वयकांनी आपणाकडे आलेल्या निबंधांपैकी उत्कृष्ट ३ निबंधांची निवड स्वतः करून रासेयो/विविमं कार्यालयास (हस्तलिखीत प्रत) सदर निबंध दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी, सायं. ५.०० पर्यंत अनिवार्यपणे जमा करावेत.

| क्र. | जिल्हा | विषय | नियम |
|---|---|---|---|
| १ | पुणे जिल्हा | सांस्कृतिक | शब्दमर्यादा : १००० शब्द<br>भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी |
| २ | अहमदनगर | पाणी | |
| ३ | नाशिक | फळबाग | |

वरील निबंधांतून सर्वोत्कृष्ट ७५ निवडक निबंधांचे पुस्तक प्रकाशन दिनांक २९ जुलै, २०२३ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये २००० विद्यार्थ्यांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होईल.

तरी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत वरीलप्रमाणे विषयासह व निर्धारीत वेळेत निबंध विभाग समन्वयकांमार्फत रासेयो/विविमं कार्यालयास दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी, सायं, ५.०० पर्यंत अनिवार्यपणे पोहोच होतील याबाबत कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**